# आदेश

गृह विभाग,
मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- १८ जानेवारी, २०१९

महाराष्ट्र पोलीस अधिनियम.

क्रमांक-सेप्रनि-१८१८/प्र.क्र.३१३/पोल-५अ, महाराष्ट्र पोलीस अधिनियम (१९५१ चा २२) च्या कलम-५ब आणि त्यानुषंगाने प्रदान करण्यात आलेल्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्र शासन याद्वारे महाराष्ट्र राज्यातील गृह विभागाच्या अखत्यारीतील पोलीस दलातील "महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम, २०११ मध्ये सुधारणा करण्यासाठी खालीलप्रमाणे नियम करीत आहे :-

१. या नियमांना "महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) (सुधारणा) नियम, २०१९" असे संबोधण्यात यावे.

२. "महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम, २०११ मधील नियम ४ चे उपखंड (१), (२) आणि (३) खालीलप्रमाणे सुधारीत करण्यात येत आहेत :-

"**(१) लेखी परीक्षा (१०० गुण) :-**

(अ) पोलीस शिपाई पदासाठी उमेदवारांची प्रथम लेखी परीक्षा घेण्यात येईल. सदरहू परीक्षा १०० गुणांची असेल.

(ब) लेखी परीक्षेमध्ये खालील विषयांचा समावेश असेल :-

(१) अंकगणित ;

(२) सामान्य ज्ञान व चालू घडामोडी ;

(३) बुध्दीमत्ता चाचणी ;

(४) मराठी व्याकरण.

(क) लेखी चाचणीचा कालावधी ९० मिनिटांचा असेल व लेखी चाचणी मराठी भाषेत घेण्यात येईल. सर्व प्रश्न बहुपर्यायी स्वरुपाची राहतील.

**(२) शारीरिक चाचणी (५० गुण) :-** जे उमेदवार लेखी चाचणीत किमान ३५% (मागास प्रवर्गातील उमेदवारांच्या बाबतीत ३३%) गुण मिळवून लेखी परीक्षा उत्तीर्ण होतील,

त्यांच्यापैकी गुणवत्ता क्रमानुसार प्रसिध्द केलेल्या जाहिरातीत प्रवर्गनिहाय नमूद केलेल्या पदसंख्येच्या १ : ५ या प्रमाणात प्रवर्गनिहाय उमेदवारांना खालीलप्रमाणे शारिरीक चाचणीसाठी पात्र ठरविण्यात येईल.

**शारीरिक चाचणी पुढीलप्रमाणे एकूण ५० गुणांची असेल :-**

**(अ) पुरुष उमेदवार :**

| | | |
|---|---|---|
| (अ) | १६०० मीटर धावणे | ३० गुण |
| (ब) | १०० मीटर धावणे | १० गुण |
| (क) | गोळा फेक | १० गुण |
| | **एकूण** | **५० गुण** |

**(ब) महिला उमेदवार :**

| | | |
|---|---|---|
| (अ) | ८०० मीटर धावणे | ३० गुण |
| (ब) | १०० मीटर धावणे | १० गुण |
| (क) | गोळा फेक (४ कि.ग्रॅ.) | १० गुण |
| | **एकूण** | **५० गुण** |

**<u>स्पष्टीकरण</u>** :- जे उमेदवार लेखी चाचणीत किमान ३५% (मागास प्रवर्गातील उमेदवाराबाबत ३३%) गुण मिळवून लेखी परीक्षा उत्तीर्ण होतील, त्यांच्यापैकी गुणवत्ता क्रमानुसार प्रसिध्द केलेल्या जाहिरातीत प्रवर्गनिहाय नमूद केलेल्या पदसंख्येच्या १ : ५ या प्रमाणात प्रवर्गनिहाय उमेदवारांना शारिरीक चाचणीसाठी पात्र ठरविण्यात येईल. उदाहरणार्थ, जर अनुसूचित जाती प्रवर्गासाठी १० जागा व अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी ५ जागा असतील तर अनुसूचित जाती प्रवर्गातील ५० (५X१०=५०) व अनुसूचित जमाती प्रवर्गातील २५ (५X५=२५) उमेदवार शारिरीक चाचणीसाठी पात्र ठरतील. तथापि, अनुसूचित जाती प्रवर्गातील गुणानुक्रमे ५० व्या क्रमांकावर असलेल्या उमेदवारास मिळालेले गुण जेवढ्या अनुसूचित जाती प्रवर्गातील उमेदवारांना मिळालेले असतील ते सर्व उमेदवार अनुसूचित जाती प्रवर्गांतर्गत शारिरीक चाचणीसाठी पात्र असतील. तसेच, अनुसूचित जमाती प्रवर्गातील गुणानुक्रमे २५ व्या क्रमांकावर असलेल्या उमेदवारास मिळालेले गुण जेवढ्या अनुसूचित जमाती प्रवर्गातील उमेदवारांना मिळालेले असतील ते सर्व उमेदवार अनुसूचित जमाती प्रवर्गांतर्गत शारिरीक चाचणीसाठी पात्र असतील.

(३) महासंचालकांनी प्रत्येक पोलीस घटकांसाठी गठीत केलेले निवड मंडळ या नियमाच्या पोटनियम (१) व (२) मध्ये नमुद केलेल्या दोन निकषांवरुन प्राप्त एकत्रित गुणांच्या आधारे उमेदवारांची गुणवत्ता यादी तयार करील. लेखी परीक्षा व शारीरिक चाचणी यामध्ये प्राप्त होणारे गुण एकत्र केल्यानंतर, उमेदवारांची अंतिम गुणवत्ता यादी सामान्य प्रशासन विभागाच्या क्रमांक एसआरव्ही-१०९७/प्र.क्र.३१/९८/१६-अ, दिनांक १६ मार्च १९९९ च्या शासन परिपत्रकामध्ये दिलेल्या टप्प्यानुसार तसेच शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार तयार करण्यात येईल."

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशांनुसार व नावाने,

(व्यं.मा.भट)
शासनाचे उप सचिव.